**डॉ. मोहन नामदेव आमृळे**
संचालक, क्रीडा व शारीरिक शिक्षण
ई मेल- id-sports.mudept@gmail.com.
वेबसाईट-www.mu.ac.in/sports

**मुंबई विद्यापीठ**

**विद्यापीठ क्रीडा संकुल**
मरीन लाईन्स, मुंबई - ४०० ०२०.
दूरध्वनी : २२८१ ७६९८/२२८२ ६०२७

परिपत्रक क्र. क्रीडा/ ७२ / २०२२
दि. १४।२।२०२२.

<u>परिपत्रक</u> :-

प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
विद्यापीठीय संलग्नीत महाविद्यालये व संस्था.

महोदय/महोदया,

आपणांस कळविण्यात येते की, सन २०२१-२२ या आर्थिक वर्षापासून पश्चिम क्षेत्रीय व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडू, संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक यांना देण्यात येणारे भत्ते रोख स्वरूपात न देता NEFT द्वारे देण्यात येत आहेत. परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे अंशतः खेळाडू, संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक यांना भत्ते त्यांच्या खात्यात अद्याप जमा झालेले नाहीत.

आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील खेळाडू, संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक यांनी सन २०२१-२२ मध्ये झालेल्या पश्चिम क्षेत्रीय व अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्पर्धेत सहभागी झालेले असतील, परंतु काही तांत्रिक अडचणीमुळे अद्यापही त्यांना देय असलेले भत्ते त्यांच्या खात्यात जमा झाले नसतील अशा खेळाडू, संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक यांची <u>**नावे धनादेश किंवा पासबुक झेरॉक्स प्रतिसह**</u> विद्यापीठ क्रीडा विभागाच्या <u>sports.mudept@gmail.com</u> या ई-मेल वर लवकरात कळविण्यात यावीत, जेणे करून खेळाडू, संघ व्यवस्थापक व प्रशिक्षक यांना लवकरात लवकर भत्ते मिळणे शक्य होईल.

धन्यवाद ! सहकार्याचे अपेक्षेत.

संचालक,
क्रीडा व शारीरिक शिक्षण